# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१ mail :pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-६९ दिनांक:- २०/०३/२०२१

## मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयात जागतिक आनंद दिन साजरा

संयुक्त राष्ट्राच्या वतीने प्रत्येकवर्षी २० मार्च हा दिवस जागतिक आनंद दिन म्हणून साजरा केला जातो. आनंदी जीवन जगण्याचा संकल्प घेवून मानवी जीवन आनंददायी होण्यासाठी या दिवशी मोठया प्रमाणावर जनजागृती केली जाते. त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये मा. सदानंद दाते, पोलीस आयुक्त व मा. एस.जयकुमार, अपर पोलीस आयुक्त यांचे संकल्पनेतुन आयुक्तालयामध्ये असलेल्या कार्यरत शाखा व सर्व पोलीस ठाणे स्तरावर विवीध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये दिनांक १९/०३/२०२१ रोजी पोलीस अधिकारी व अंमलदार यांची बैठक घेवून "आंनदी कसे राहता येईल" या विषयावर चर्चासत्र आयोजीत करण्यात आले होते. त्यामध्ये अधिकारी व अंमलदार यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेवुन विवीध कलागुण सादर केले.

दिनांक २०/०३/२०२१ रोजी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरीता कामाचा ताण कमी व्हावा व त्यांच्यामध्ये आनंदी व सकारात्मक भाव निर्माण व्हावा या करीता प्रसिध्द व्याख्याते, गीतकार श्री. प्रवीण दवणे यांचे "आंनदी राहणे व आंनदाने कर्तव्य पार पाडणे" या विषयावर व्याख्यान आयोजीत करण्यात आले होते. सदर व्याख्यानाचा पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी प्रत्यक्ष व ऑनलाईन पध्दतीने लाभ घेतला आहे. सदरवेळी श्री प्रवीण दवणे यांनी पोलीसांना त्यांच्या व्यस्त कामातुन स्वत:साठी छंद जोपासण्याचा व सकारात्क दृष्टीने जीवणाकडे पाहण्याचा मुलमंत्र दिला.

याचबरोबर आयुक्तालयातील पोलीस ठाणे स्तरावर मालमत्तेविरोधीच्या गुन्हयात चोरीस गेलेल्या व तपासात निष्पन्न करुन जप्त करण्यात आलेला नऊ गुन्हयातील एकुण ५,५६,१३० रुपये किंमतीचा मुद्देमाल संबंधीत फिर्यादींना परत करुन नागरिंकाचा आंनद द्विगुणीत करण्याचा पोलीसांकडुन प्रयत्न करण्यात आला. तसेच आयुक्तालय कार्यक्षेत्रातील आमचा घर, नोव्हेल फाउंडेशन, राधिका, स्नेहाजंली एल्डर केअर होम, नालासोपारा पश्चिम, मातोश्री, मदर तेरेसा आश्रम, अंकुर अनाथालय, या व यासारख्या विवीध वृध्दाश्रम, अनाथाश्रम, बालकाश्रम या ठिकाणी पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी भेटी देवून तेथील उपस्थितांशी चर्चा करुन त्यांना पुष्प, खादयपदार्थ व मिठाई वाटप करुन त्यांच्यामध्ये आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. एकदंरीत ख-या अर्थाने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी, अंमलदार यांनी जागतिक आंनद दिन एक अनोख्या पध्दतीने साजरा केला आहे.

सदरचा उपक्रम राबवण्यासाठी मा. सदानंद दाते, पोलीस आयुक्त व मा. एस.जयकुमार, अपर पोलीस आयुक्त, यांचे मार्गदर्शनाखाली सर्व पोलीस उप आयुक्त, सहा.पोलीस आयुक्त, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व अधिकारी आणि अंमलदार यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला आहे.